**Secondary Education Society's**

# Arts and Science College, Bhalod
# Taluka-Yawal, Dist- Jalgaon 425304

**NAAC Reaccredited "B" Grade**

**E-mail: ascbhalod@gmail.com, Web: ascbhalod.ac.in. Ph.Office: +91-02585- 242229. Fax: +91-02585-242411**

# National Service Scheme
## (Academic Year 2019-2020)

Red Ribbon Club [19/08/2019]



नवी आशा नवी दिश

देशदूत

र्ष २२ । अंक २८७ । मंगळवार, दि. १५ ऑक्टोबर २०१९ । पाने १०+४ किंमत ₹ ४

देशदूत भुसावळ जंक्शन

मंगळवार, दि. १५ ऑक्टोबर २०१९ | पान - ४

## रासेयोतर्फे रेड रिबिन क्लबची स्थापना

■ भालोद, ता.यावल । वार्ताहर

येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थीनींना एचआयव्ही/एड्स व लैंगिक आजाराविषयी योग्य माहिती देण्यासाठी व त्यांच्यापर्यंत जनजागृतीपर माहिती पोहचवण्यासाठी रेड रिबन क्लबची स्थपना करण्यात आली आहे. रासेयो स्वयंसेवक-स्वयंसेविकांनी एचआयव्ही/एड्स संदर्भातील शास्त्रीय माहिती रेड रिबन क्लब मार्फत समाजातील इतर घटकांना द्यावी व रोगाचा प्रसार रोखून निरोगी भारत स्वस्थ भारत उभारणीस मदत करावी, असे आवाहन नोडल अधिकारी व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आशुतोष वर्डीकर यांनी केले. कार्यक्रमात न्हावी ग्रामीण रूग्णालयाचे एचआयव्ही/एड्स सामुपदेशक मनोज चव्हाण व प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्रीमती पौर्णिमा चव्हाण यांनी उपस्थितांना एचआयव्ही/एड्स आजाराविषयी सविस्तर व शास्त्रशुध्द माहिती सांगितली. तसेच स्वयंसेवक-स्वयंसेविकांची मोफत चाचणी करण्यात आली. रेड रिबन क्लबमध्ये सहभागी विद्यार्थी पुढीलप्रमाणे बुध्दभुषण अढाळे, सुरेश शांताराम तायडे, भिमराव वाघ, कोमल पोहरे, हर्षल मेघे, आकाश सोनवणे, अनिकेत भालेराव, वैभव तायडे, प्रतिक महाजन, अमित तडवी, मनिषा तायडे, अनिकेत लोंढे, आसिफ तडवी, सोनाली तायडे, अमित तायडे, प्राचार्य डॉ. अजयकुमार [illegible], सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.पी.ए.सावळे, क्रिडा संचालक प्रा.एम.यु. पवार व प्रा.सौ.डॉ. मिनाक्षी राणे उपस्थित होते.

# Tree Plantation













नवी आशा, नवी दिशा

देशदूत

जळगाव | सोमवार, दि. ८ जुलै २०१९ | वर्ष २२ | अंक १९१ | पाने : १०+४ | किंमत : ₹ ४

देशदूत तापी खोरे...

सोमवार, दि. ८ जुलै २०१९ ③

■ भालोद, ता.यावल । वार्ताहर

## भालोद महाविद्यालयात वृक्षारोपण

सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालय भालोदच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक व विद्यार्थी विकास विभागातर्फे 'एकच लक्ष ३३ कोटी वृक्ष' अभियाना अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. अभियानाची सुरुवात से.ए.सोसायटी अध्यक्ष आमदार हरिभाऊ जावळे यांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाली. प्रसंगी आमदार हरिभाऊ जावळे यांनी स्वयंसेवक स्वयंसेविकांशी संवाद साधून वृक्षसंवर्धनाचे महत्व विषद केले.

वृक्षारोपण अभियानास स.ए.सोसायटी व्हाईस चेअरमन सौ.हेमलताताई इंगळे, माजी चेअरमन गणेश गिरधर नेहेते, नितीन लहू चौधरी, अरुण रामदास चौधरी, भास्कर पिंगळे, इच्छाराम चौधरी, प्राचार्य डॉ.ए.एस.कोल्हे, उपप्राचार्य प्रा.एम.टी. चौधरी यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रासेयो अधिकारी प्रा.डॉ. आशुतोष वर्डीकर, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.राकेश चौधरी, आयक्यूएसी प्रमुख डॉ.गणेश चौधरी, महिला रासेयो अधिकारी डॉ.वर्षा नेहेते, सहाय्यक अधिकारी प्रा.डॉ.पी.ए.सावळे, प्रा.के. एस.पाटील, रासेयो स्वयंसेवक स्वयंसेविका यांनी प्रयत्न केले.



नवी आशा नवी दिशा

देशदूत

जळगाव वर्ष २२ । अंक २२४ । बुधवार, दि. २१ ऑगस्ट २०१९ । पाने १० + ४ किंमत ₹ ५

देशदूत भुसावळ जंक्शन

बुधवार, दि. २१ ऑगस्ट २०१९ पान - ८

वृक्षाला राखी बांधतांना रासेयो स्वयंसेविका

## रासेयो स्वयंसेवकांनी वृक्षांना बांधली राखी

■ भालोद, ता.यावल । वार्ताहर

येथील से.ए. सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे एकच लक्ष ३३ कोटी वृक्ष अभियानांतर्गत महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले आहे. दि.१५ ऑगस्ट रक्षाबंधनाच्या दिवशी स्वयंसेवक व स्वयंसेविकांनी अभिनव उपक्रम राबवला. त्यांनी लहान लहान ग्रुप करून लागवड करण्यात आलेले वृक्ष दत्तक घेतले व त्यांचे वर्षभर संरक्षण व संवर्धन करण्याचा संकल्प केला. हा उपक्रम रासेयो अधिकारी प्रा.डॉ. आशुतोष वर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.यावेळी प्राचार्य डॉ.ए.एस. कोल्हे यांनी कार्यक्रमस्थळी भेट दिली. यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.पी.ए. सावळे, प्रा.डॉ. सौ.व्ही.के. नेहेते यांनी परिश्रम घेतले.

दृष्टीकोन » वाहन उद्योगाला अपघात | भुसावळ » दोन गट भिडले | नंदुरबार

आपला आवाज. आपली शक्ती

जनशक्ति

» पोस्टल परवाना क्रमांक JAL/३५९/२०१९:२०२१ मंगळवार २० ऑगस्ट २०१९ » जळगाव/धुळे/नंदुरबार

०५ जनशक्ति | www.ejanshakti.com
जळगाव, मंगळवार, २० ऑगस्ट २

# भुसावळ परिसर

## रासेयो स्वयंसेवकांनी बांधली वृक्षांना राखी

**भालोद।** सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालय भालोदच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे रक्षाबंधनाच्या दिवशी वृक्षांना राखी बांधली. प्रा.डॉ.आशुतोष वर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवण्यात आला. प्राचार्य डॉ.अजय कोल्हे यांनी भेट दिली. यशस्वीतेसाठी डॉ. पद्माकर सावळे व प्रा.डॉ. वर्षा नेहेते यांनी परीश्रम घेतले.

# Swachhata Abhiyan














देशदूत


नवी आशा नवी दिशा

देशदूत संमिश्र

**एनएसएसतर्फे स्वच्छता अभियान**

भालोद.ता.यावल । वार्ताहर

कला व विज्ञान महाविद्यालय भालोद, राष्ट्रीय सेवा योजना एनएसएसतर्फे स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत स्वच्छता अभियान कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. आशुतोष वर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. अजय कोल्हे यांनी भेट दिली. यशस्वीतेसाठी डॉ.पी.ए.सावळे, डॉ. सौ व्हि.के. नेहेते यांनी प्रयत्न केले.



आपला आवाज. आपली शक्ती

जनशक्ति

जनशक्ति भुसावळ परिसर

शॉर्ट न्यूज

**भालोद विद्यालयातर्फे स्वच्छता अभियान**

भालोद । भालोद कला व विज्ञान महाविद्यालय भालोदच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वयंसेवक, स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आशुतोष वर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान राबविण्यात आले. प्राचार्य डॉ.अजय कोल्हे यांनी भेट दिली. सहाय्यक अधिकारी डॉ.पी.ए.सावळे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. व्ही.के.नेहेते यांनी परिश्रम घेतले.

Tambakhu Mukta Yuvak Abhiyan-Shapath



नवी आशा, नवी दिशा

# देशदूत

Edition: mobile.deshdoot.com | www.facebook.com/deshdoot | www.deshdoot.com

जळगाव | शनिवार, दि. १३ जुलै २०१९ | वर्ष २२ | अंक १९६ | पाने : १०+४ | किंमत : ₹ ४ |


हृदयाचे व मू...
विद्या विकास हॉस्पिटल...




## भालोद महाविद्यालयात रासेयोतर्फे 'तंबाखूमुक्त युवक अभियान'

■ भालोद, ता.यावल । वार्ताहर

सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, भालोदच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे 'तंबाखू मुक्त युवक' अभियान राबवण्यात आले. अभियानाअंतर्गत तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणाम विषयी माहितीपट दाखवण्यात आला. प्रसंगी उपप्राचार्य प्रा.मुकेश चौधरी स्वयंसेवक - स्वयंसेविकांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, निरोगी व आनंदी जीवनासाठी व्यसनापासून दूर राहणे आवश्यक आहे. त्यानंतर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आशुतोष वर्डीकर यांनी उपस्थितांना तंबाखू व्यसनापासून परावृत्त राहण्यासाठी सामुहिक शपथ दिली. आयुष्यात कधीही सिगारेट, बीडी, खुटखा, पान-मसाला, हुक्का ई-सिगारेट किंवा कोणत्याही तंबाखू उत्पादनास स्पर्श करणार नाही व इतरांसाही परावृत्त होण्यासाठी प्रोत्साहीत करण्याचे शपथेत म्हटले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आशुतोष वर्डीकर, सहाय्यक अधिकारी प्रा.डॉ.पी.ए.सावळे, महिला अधिकारी प्रा.डॉ.सौ. वर्षा नेहेते, प्रा.के.एस.पाटील, स्वयंसेवक -स्वयंसेविका यांनी प्रयत्न केले.

# NSS Day



दैनिक दिव्य मराठी
दिव्य सिटी
राष्ट्रीय सेवा योजनेतून रुजतात श्रमसंस्कार
भालोद महाविद्यालयात उपप्राचार्य प्रा. मुकेश चौधरींचे प्रतिपादन; स्वयंसेवकांशी साधला संवाद
प्रतिनिधी | भालोद
स्वच्छतेला प्राधान्य द्यावे : डॉ. कोल्हे




वैचारिक क्रांतीचा अग्रदूत
देशोन्नती
भुसावळ
रासेयोतून मानसिक, सामाजिक आरोग्याचे संवर्धन - प्रा. मुकेश चौधरी
भालोद महाविद्यालयात 'रासेयो' स्थापना दिनानिमित्ताने कार्यक्रम




देशदूत
तापी खोरे...
गुरुवार, दि. ३ ऑक्टोबर २०१९
राष्ट्रीय सेवा योजनेतून शारीरिक, मानसिक अन् सामाजिक आरोग्याचे संवर्धन -प्रा.मुकेश चौधरी
भालोद, ता.यावल । वार्ताहर
राष्ट्रीय सेवा योजनेतून शारीरिक, मानसीक आणि सामाजिक आरोग्याचे संवर्धन होत असते. कारण राष्ट्रीय सेवा योजनेत श्रमसंस्कार घडतात. त्यातून शारीरिक आरोग्य संवर्धन होते. सकारात्मक दृष्टीकोन व व्यक्तिमत्वाचे विविध पैलू विकसीत झाल्याने मानसिक विकास होतो तर समाजातील विविध घटकांशी स्वयंसेवकांचा प्रत्यक्ष संपर्क आल्याने त्यांच्या सामाजिक आरोग्याचा विकास होतो, असे प्रतिपादन उपप्राचार्य प्रा.मुकेश चौधरी यांनी केले. भालोद येथील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय 'सेवा योजना स्थापना दिनानिमित्त' आयोजित कार्यक्रमात 'राष्ट्रीय सेवा योजनेत युवा शक्तिचा उपयोग' या विषयावर ते बोलत होते. आपला अहंकार गळाला तरच आपण राष्ट्रीय सेवा योजनेत काम करू शकतो. केवळ राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी झाल्याने व्यक्तिमत्व विकास होत नाही तर राष्ट्रीय सेवा योजान खऱ्या अर्थाने 'जगल्याने' व्यक्तिमत्वाचा विकास व कायापालट होतो.
केवळ दहा गुणांच्या लाभासाठी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी न होता व्यक्तीगत व सार्वजनिक स्वच्छतेबाबत रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी संत गाडगेबाबा, महात्मा गांधी यांचा आदर्श डोळ्यासोर ठेवून समर्पित भावनेने काम करावे. धर्म कोणत्याही रांगेत नसून खरा धर्म राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये दिसतो असेही ते पुढे म्हणाले.
भालोद येथील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककाने 'राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिना'निमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एस.कोल्हे होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिंगल युज प्लॅस्टिकचा वापर बंद करण्याबाबत केलेल्या आवाहनाला तसेच 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमाला रा.से.यो.स्वयंसेवकांनी सकारात्मक प्रतिसाद देवून समाजात त्याबाबत जनजागृती करावी, असे आवाहन प्राचार्य डॉ.ए.एस.कोल्हे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना एककाचे महाविद्यालयातील कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आशुतोष वरडीकर यांनी केले. आभार प्रदर्शन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. पी.ए.सावळे यांनी केले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेवक बुध्दभूषण आढळे यांनी केले. प्रा.डॉ.ए.आर.वरडीकर व प्रा.डॉ. पी.ए.सावळे यांचे मार्गदर्शनाखाली रा.से.यो.स्वयंसेवकांनी कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन केले होते. कार्यक्रमास रा.से.यो.चे स्वयंसेवक तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# NSS Seven day Camp at Amoda Tal. Yawal Dist. Jalgaon

[22/12/2019 To 28/12/2019]


कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संलग्नित

कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद

ता.यावल, जि.जळगांव.

राष्ट्रीय सेवा योजना

NOT ME BUT YOU

एक भारत – श्रेष्ठ भारत

संविधान दिन ते राष्ट्रीय समरसता दिन अभियान

Clean Campus Mission (CCM)

विशेष हिवाळी शिबीर

दिनांक २२/१२/२०१९ ते २८/१२/२०१९

स्थळ :- ग.का.विद्यालय, आमोदे, ता.यावल, जि.जळगांव.

आदरणीय महोदय

सप्रेम नमस्कार

आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाचे सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील विशेष हिवाळी शिबीर, आमोदे, ता.यावल येथे आयोजित करण्यात येत आहे. सदर शिबीराच्या उद्घाटन व समारोप समारंभासह इतर कार्यक्रमांना आपण उपस्थित राहून युवाशक्तीस प्रोत्साहन द्यावे ही विनंती.

विनीत


डॉ.ए.एस.कोल्हे, प्राचार्य

प्रा.डॉ.ए.आर.वडीकर, कार्यक्रम अधिकारी

प्रा.डॉ.पी.ए.सावळे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी

प्रा.डॉ.सौ.व्ही.के.नेहेते, महिला कार्यक्रम अधिकारी

राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक–स्वयंसेविका













Latitude: 21.147753
Longitude: 75.831263
Elevation: 285.65m
Accuracy: 3.1m
Time: 12-22-2019 11:35
Powered by NoteCam

Latitude: 21.1478
Longitude: 75.831225
Elevation: 269.85m
Accuracy: 2.3m
Time: 12-22-2019 11:43
Powered by NoteCam






















शिल्पकार विकासाचा...
देशदूत
deshdoot.com | जळगाव | वर्ष २३ । अंक ४७ । रविवार, दि. ९ फेब्रुवारी २०२० । पाने १२+८ | किंमत ₹ ४
देशदूत My भुसावळ
। रविवार, दि. ९ फेब्रुवारी २०२० । पान १० ।


## आमोदा येथे भालोद महाविद्यालयाचे रासेयो शिबीर

भालोद, ता. यावल । वार्ताहर




शिल्पकार विकासाचा...
देशदूत
deshdoot.com | जळगाव | वर्ष २३ । अंक ५० । बुधवार, दि. १२ फेब्रुवारी २०२० । पाने १०+४ | किंमत ₹ ५
देशदूत My भुसावळ
। बुधवार, दि. १२ फेब्रुवारी २०२० । पान ५ ।


## भालोद महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचा समारोप


भालोद, ता.यावल । वार्ताहर

# Celebration of 'Sardar Patel Jayanti'









नवी आशा नवी दिशा

देशदूत

जळगाव वर्ष २२ । अंक ४०८ । बुधवार, दि. ६ नोव्हेंबर २०१९ । पाने १०+४ किंमत ₹ ५

देशदूत भुसावळ जंक्शन


बुधवार, दि. ६ नोव्हेंबर २०१९ | पान - ५

सरदार पटेल यांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली प्रसंगी उपस्थित प्राचार्य, रासेयो अधिकारी व स्वयंसेवक आदी मान्यवर

## रासेयोतर्फे सरदार पटेल जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

भालोद, ता.यावल । वार्ताहर

येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती राष्ट्रीय एकात्मता दिवस म्हणून विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. कार्यक्रम अधिकारी डॉ.आशुतोष वर्डिकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ.अजय कोल्हे यांच्यासह उपस्थितांनी सरदार पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्रसंगी प्रा.डॉ.पी.एस. चौधरी यांनी उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मेची शपथ दिली. यानंतर राष्ट्रीय एकात्मता दौडचे आयोजन करण्यात आले आहे. यात प्राचार्य डॉ. अजय कोल्हे, रासेयो अधिकारी डॉ.आशुतोष वर्डिकर, सहा.रासेयो अधिकारी डॉ.पी.ए. सावळे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. राकेश चौधरी, भानुदास पतणे, प्रा.एस.टी. इंगळे, शिक्षकेतर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक, स्वयंसेविका यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.



# Celebration of 'Savidhan Din' [26/11/2019]









नवी आशा नवी दिशा

देशदूत

आवृत्ती www.deshdoot.com जळगाव वर्ष २२ । अंक ३२९ । बुधवार, दि. २७ नोव्हेंबर २०१९ । पाने १०+४ किंमत

बुधवार, दि. २७ नोव्हेंबर २०१९

देशदूत तापी खोरे... २

## संविधान दिनानिमित्त प्रास्ताविकेचे वाचन व अभि

भालोद, ता.यावल – येथील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.जतीनकुमार मेढे यांनी जगण्यात संविधान आणण्याचे आवाहन केले. समाजातील उपेक्षित वर्गाच्या विकासासाठी भारतीय संविधान मोठी भुमिका पार पाडित असून संविधानीक पदांचा आदर केलाच गेला पाहिले असे त्यांनी सांगितले. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आशुतोष वर्डीकर यांनी प्रास्ताविक करून उद्देश पत्रिकेचे वाचन केले. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.पद्माकर सावळे यांनी आभार मानले. यावेळी सहाय्यक महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.सौ.वर्षा नेहेते, प्राध्यापक व कर्मचारी वृंद, रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# Mahavakathon [30/11/2019]







